पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

सभावृत्तांत

कार्यपत्रिका क्रमांक १०

दिनांक: १४/०१/२०१५ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक १४/०१/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा. सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे - सभापती
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा. आर.एस. कुमार
४. मा. जावेद रमजान शेख
५. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
६. मा. पांढरकर निलेश शंकरराव
७. मा. राजू मिसाळ
८. मा.नेटके सुमन राजें राजेंद्र
९. मा. तरस बाळासाहेब जयवंत
१०. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
११. मा. प्रसाद शेट्टी
१२. मा.अविनाश (दादा) टेकवडे
१३. मा.सौ. काळभोर वैशाली जालिंदर

याशिवाय श्री. डॉ.महेशकुमार डोईफोडे-क्षेत्रीय अधिकारी, श्री. शेख फारुख, - कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.मिलींद कपिले - कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री. प्रदिप पुजारी - उपअभियंता – स्थापत्य/ झोनिपु, श्री.सुनिल वाघुंडे, श्री.संजय भोसले, श्री.अनिल शिंदे - उपअभियंता स्थापत्य, श्रीम.लता बाबर - उपअभियंता विद्युत, श्री.करमरकर, श्रीम.झेड.मोमिन - उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.पांडूरंग जाधव-लेखाधिकारी, श्री.शिर्के डी.जे.- मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.कुंभार पी.यू. – उद्यान पर्यवेक्षक (हॉर्टी.), आर.बी.निकाळजे-उद्यान पर्यवेक्षक इत्यादी अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

अ) दिनांक १७/१२/२०१४ रोजी घेणेत आलेल्या माहे डिसेंबर २०१४ चे मासिक सभेचा सभात्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र. ९) कायम करणेत आलेचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६३ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १४/०१/२०१११५ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. भोंडवे संगिता राजेंद्र | अनुमोदक | : बाळासाहेब तरस |

संदर्भ: मा. मोरेश्वर महादु भोंडवे यांचे दिनांक १७/१२/२०१४ रोजीचे पत्र

प्रभाग क्रमांक १९ मधील वाल्हेकरवाडी परिसरामधील रस्त्यांचे नामकरणाबाबत.

१. सेलेस्टियल सिटी मागे सर्व्हे नं. ७७ मधील रस्त्यास "संतोष दत्तात्रय भोंडवे मार्ग"
२. शिंदेवस्ती रावेत पासून डी मार्टकडे जाणा-या रस्त्यास "कै.चंद्रभागा महादु भोंडवे मार्ग"
३. शिंदेवस्ती MIDC रोड सोनटक्के वस्तीच्या कडेने उजव्या साईडला जाणाऱ्या रस्त्यास "कै.महादु हरी भोंडवे पथ"
४. वाल्हेकरवाडी भोंडवे वस्तीकडे जाणा-या रस्त्यास "कै.बबीबाई विनायक शिंदे मार्ग"

वरील प्रमाणे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६४ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १४/०१/२०१५ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.वैशाली जालिंदर काळभोर | अनुमोदक | : मा. अविनाश (दादा) टेकवडे |

संदर्भ: मा. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर येथील प्रभूचेंबर्स सोसायटी ते श्री गणेश प्रसारक ट्रस्ट या पदपथास "कै.सौ.सुमन अविनाश काळभोर मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६५ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : १४/०१/२०१५ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.वैशाली जालिंदर काळभोर | अनुमोदक | : मा. अविनाश (दादा) टेकवडे |

संदर्भ: मा. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर मधील कृष्णा पार्क सोसायटी ते काळभोर निवास या पदपथास "कै.सावळेराम खंडूजी काळभोर पथ" असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६६ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १४/०१/२०१५ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव | अनुमोदक | : मा. पांढरकर निलेश शंकरराव |

संदर्भ: मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव

आकुर्डी गावठाण परिसरात स्टॉर्मवॉटर लाईन टाकणेबाबत.

१. आकुर्डी गावठाण भैरवनाथ मंदिर ते आकुर्डी प्राधिकरण रोड (इंदिरा चौक) पर्यंत
२. विजय कॉलनी ते गुरुदेवनगर रोड
३. गंगानगरमध्ये शिसोदिया दुकान दत्तमंदिर ते कै.पांडूरंग काळभोर सभागृह व पांढरकर उद्यानापर्यंत.

वरील ठिकाणी स्टॉर्मवॉटर लाईन टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६७ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : १४/०१/२०१५ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव | अनुमोदक | : मा. पांढरकर निलेश शंकरराव |

संदर्भ: मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव

**संदर्भ : मा.प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचे दिनांक २२/१२/२०१४ रोजीचे पत्र**

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाणातील काही भागातील घरे ही ३० ते ४० वर्षे जुनी आहेत. तसेच दर ३ वर्षांनी रस्त्याचे डांबरीकरण केले जात असलेने रस्त्याची उंची वाढत आहे. घरे रस्त्यांपेक्षा दोन ते अडीच फुट खाली असल्याने पावसाळयात रस्त्यावरील पावसाचे पाणी नागरीकांच्या घरात /चाळीत शिरते. संपूर्ण पावसाळा याचा नागरीकांना त्रास सहन करावा लागतो. या भागातील ड्रेनेज लाईन पाणी लाईन व पावसाळी गटर लाईनची उंची देखील चाळीतील व इतर काही घरांपेक्षा उंच असलेने घरातील पाणी मोरीद्वारे बाहेर जात नसलेने पावसाळयात नागरीकांच्या घरात पाणी शिरुन होणारा त्रास कमी करण्यासाठी सदरचे भागातील रस्त्याची उंची कमी करणे व ड्रेनेज लाईन तसेच पावसाळी गटर लाईनची उंची कमी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे)
सभापती
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-४४
अक्षेका /११/कावि/ ३७ /२०१५
दिनांक : ०६ / ०१ /२०१५

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती